# योजनेचे नांव- प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.:-एबावि-२०२५/प्र.क्र.११६/का-५ दि. ०७ नोव्हेंबर, २०२५

**उद्दिष्टे -**

(१) माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहितकरुन त्यांच्या आरोग्यात सुधारणा करणे.

(२) जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचे आरोग्य सुधारावे आणि माता मृत्यू व बाल मृत्यू दरात घट होऊन तो नियंत्रणात राहावा.

(३) सदरचा लाभ हा जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर सुधारणे, स्त्री भ्रूणहत्येस प्रतिबंध करणे आणि स्त्री जन्माचे स्वागत होण्यासाठी हितकारी ठरेल.

(४) लाभार्थ्यांकडून आरोग्य संस्थांच्या सुविधांचा लाभ घेण्याचे प्रमाण वाढून संस्थात्मकप्रसुतीचे प्रमाण वृद्धींगत करणे.

(५) नवजात अर्भकाच्या जन्माबरोबरच जन्म नोंदणीचे प्रमाणात वाढ करणे.

**पात्र लाभार्थ्यास अनुज्ञेय लाभ व त्यांचे वितरण-**

प्रधानमंत्रीमातृवंदनायोजनेंतर्गत विहित अटी / शर्ती आणि कागदपत्रांची पूर्ततेअंती पात्र लाभार्थी महिलेस पहिल्या अपत्यावेळीरु. ५०००/- चा लाभ दोन हप्त्यांमध्ये तर दुसरे अपत्य मुलगी झाल्यास मुलीच्या जन्मानंतर एकाच टप्प्यात रु. ६०००/- चा लाभ तिच्या आधार संलग्न बँक खात्यात किंवा पोस्ट ऑफिसमधील खात्यात DBT द्वारे जमा करण्यात येईल.

| टप्पा | अट | पहिल्या अपत्यासाठी | दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर |
|---|---|---|---|
| पहिला हप्ता | राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या शासकीय आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी आणि शेवटच्या मासिक पाळीच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत किमान एक प्रसूतीपूर्व तपासणी झालेली असावी | रु. ३०००/- | एकत्रित रु. ६०००/- |
| दुसरा हप्ता | I. बाळाची जन्म नोंदणी<br>II. बालकास बीसीजी, ओपीव्हीझीरो, ओपीव्ही ३ मात्रा, पेन्टाव्हॅलेन्ट लसीच्या ३ मात्रा अथवा समतुल्य / पर्यायी लसीकरणाचे प्राथमिक चक्र पूर्ण करणे आवश्यक. | रु. २०००/- | |

**पात्रता-**

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेंतर्गतवरीलप्रमाणे लाभ मिळणेकरिता**वय वर्ष १८ ते ५५ वयोगटातील खालीलपैकी किमान एक अट पूर्ण करणारी महिला पात्र**राहील. (त्याकरिता किमान एका ओळखपत्राच्या पुराव्याची प्रत जोडणे आवश्यक आहे) :-

(१) ज्यांचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्षरु. ८ लाख पेक्षा कमी आहे.

(२) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील
(३) ४०% व अधिक अपंगत्व असणाऱ्या (दिव्यांग जन).
(४) बीपीएल शिधापत्रिकाधारक
(५) आयुष्मान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत लाभार्थी.
(६) ई-श्रम कार्ड धारक
(७) किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी
(८) मनरेगाजॉबकार्ड धारक
(९) गर्भवती आणि स्तनपानकरणाऱ्याअंगणवाडी सेविका (AWW)/अंगणवाडी मदतनीस (AWH)/आशा कार्यकर्ती (ASHA)
(१०) अन्न सुरक्षा कायदा, २०१३ अंतर्गत रेशनकार्डधारक महिला लाभार्थी.

**लाभार्थ्याने वरील नमूद किमान एका तपशीलासह खालील कागदपत्रे व माहिती देणे आवश्यक राहील-**

१. आधार कार्ड प्रत किंवा आधार नोंदणी (EID) कागदपत्र
२. परिपूर्ण भरलेले माता आणि बाल संरक्षण कार्ड ज्यामध्ये शेवटच्या मासिक पाळीची तारीख, गरोदरपणाची नोंदणी तारीख, प्रसुतीपूर्व तपासणीच्या नोंदी असाव्यात.
३. बाळाचे जन्म नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.
४. माता आणि बाल संरक्षण कार्डवर बाळाच्या लसीकरणाच्या नोंदी असलेल्या पानाची प्रत.
५. गरोदरपणाची नोंदणी केलेला RCH पोर्टलवरीललाभार्थी नोंदणी क्रमांक.
६. लाभार्थीचास्वतःचा किंवा कुटुंबातील सदस्यांचा मोबाईल क्रमांक.
७. वेळोवेळी विहित केलेले अन्य कागदपत्र.

महाराष्ट्र शासन

# रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

# महिला व बाल विकास विभाग

## प्रधानमंत्री मातृवंदना योजना

### उद्देशः

- गरोदरपणात आणि बाळंतपणात महिलांना आरोग्य सेवा-सुविधा आणि प्रोत्साहनाच्या माध्यमातून कुपोषणाचा प्रभाव कमी करणे.
- माता व बाल आरोग्य सुधारणे.

### लाभाचे स्वरूपः

| टप्पा | अट | पहिल्या अपत्यासाठी | दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर |
|---|---|---|---|
| पहिला हप्ता | राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या शासकीय आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी आणि शेवटच्या मासिक पाळीच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत किमान एक प्रसूतीपूर्व तपासणी झालेली असावी. | रु.३०००/- | एकत्रित रु.६०००/- जन्म दाखला असणे आवश्यक व बालकाचे पेंटा ३ पर्यंतचे (१४ आठवडे) लसीकरण झालेले असणे आवश्यक |
| दुसरा हप्ता | I. बाळाची जन्म नोंदणी<br>II. बालकास बीसीजी, ओपीव्हीझीरो, ओपीव्ही ३ मात्रा, पेन्टाव्हॅलेन्ट लसीच्या ३ मात्रा अथवा समतुल्य / पर्यायी लसीकरणाचे प्राथमिक चक्र पूर्ण करणे आवश्यक. | रु. २०००/- | |



### पात्र लाभार्थीः

- पहिले बाळ मुलगा किंवा मुलगी असलेली व दुसरे बाळ मुलगी असलेली महिला जी खालीलपैकी कोणत्याही एका निकषात बसत असेल अशी महिला पात्र आहे.

### निकष

१) ज्या महिलांचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्ष रु. ८ लाखापेक्षा कमी आहे.
२) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या महिला.
३) पात्र लाभार्थी ज्यांच्याकडे राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत रेशन कार्ड उपलब्ध आहे.
४) ज्या महिला अंशतः (४० टक्के) किंवा पूर्ण अपंग आहेत (दिव्यांग जन)
५) बी.पी.एल. रेशनकार्ड असलेली महिला.
६) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत महिला लाभार्थी.
७) ई- श्रम कार्ड असलेली महिला,
८) किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी
९) मनरेगा जॉब कार्ड असलेली महिला.
१०) अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा सेविका

### आवश्यक कागदपत्रेः

- लाभार्थीचे आधार कार्ड
- गरोदरपणाचे नोंदणीचे कार्ड, बाळाचे लसीकरण कार्ड
- लाभार्थीचे आधार कार्ड जोडलेले व DBT स्नेही बँक खाते



### माहिती, अर्ज व मदतीसाठी संपर्कः

- आपल्या जवळच्या अंगणवाडी परेवेक्षिका व सेविका, यांच्याशी संपर्क साधा.
- अधिक माहितीसाठी १४४०८ या टोल फ्री हेल्पलाईन क्रमांकावर फोन करा.
- लाभार्थी https://pmmvy.wcd.gov.in/ या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करु शकता.